पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १८४**
(सभावृत्तांत)

**दिनांक – १२/०८/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.स्थायी** समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **१२/०८/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते तसेच सदर सभेत काही सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चौंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त (१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.इंदलकर – सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.घोडे, मा.गट्टूवार, मा.पवार – कार्यकारी अभियंता, मा.दांगट – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी पीएमपीएमएल हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर

अभियंता, मा.तांबे - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.देशमुख, मा.धुमाळ, मा.शिंदे, मा.टकले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१४) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७२५५ दि.२२/०७/२०२० दुरुस्त करणेबाबत – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१५) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७२६७ दि.२२/०७/२०२० दुरुस्त करणेबाबत – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१६) अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ऑटो क्लस्टर सेंटर मधील मोकळया हॉलमध्ये करोना (COVID 19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे.

विषय क्र.१८) सन २०१९-२० या वर्षातील संचलन तूट व विविध प्रकारचे पासेसपोटी अग्रीम रक्कम अदा करणेबाबत.

विषय क्र.१९) मानधनावर नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी (BAMS, BHMS, BUMS) व दंतशल्य चिकित्सक यांना र.रु.५०,०००/- इतके मानधन अदा करणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.२०) फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.११ घरकुल योजना चिखली येथील Covid Care Centre (CCC) चे D5, D6, D7, D8, व नविन B9, B10, B11,B12 व F19 एकूण ९ इमारती करीता तात्पुरत्या स्वरुपात जनित्रसंच भाडेतत्वावर वापरणेबाबत...

विषय क्र.२१) Covid-19 रुग्णांकरिता Convalescent Plasma Therapy या उपचार पध्दती करण्यासाठी Single Donar Platelet Bag with ACD Solution Kit ची तातडीने खरेदी करणेबाबत – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ७३२५ विषय क्रमांक – १
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – इ क्षेत्रिय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.ईक्षेका/आ/४/कावि/४८७/२०२०, दि.२०/०७/२०२०

मा.अति. आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अंतर्गत इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग ३, ४, ५ व ७ मधील ५५ ब्लॉक ४२४ सिटस सार्वजनिक शौचालय व मुता-याची यांत्रिक पध्दतीने व मनुष्यबळादारे दैनदिन साफसफाई व देखभाल दुरुस्ती करणे कामाचा मा.आयुक्त सो यांचेकडील दिनांक २/१/२०१८

चा मान्य प्रस्ताव करण्यात आला. (नि.नो.क्र.४/२०१८-२०१९) अन्वये निविदा र.रु.३५,८१,९५२/- एक वर्ष कालावधीसाठी प्रसिध्द करणेत आलेला होती. मे.महालक्ष्मी स्वंयरोजगार सेवा संस्था यांनी निविदा रक्कमेच्या ३५% कमी दराने म्हणजेस र.रु.२३,२८,२६९/- दर प्रति सिटस प्रति माहे र.रु.४५८/- स्विकृत करणेत आलेला आहे. मे.महालक्ष्मी स्वंयरोजगार सेवा सह संस्था मर्या. या संस्थेस देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.११/१०/२०१८ ते १०/१०/२०१९ अखेर होती. सदर निविदा दिनांक १०/१०/२०१९ रोजी मुदत संपुष्टात येत असल्याने निविदा क्र.२/२०१९-२०२० तयार करण्यात आलेली होती. परंतु मा.आरोग्य वैदयकिय आधिकारी यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/३५८/२०१९ दिनांक ३०/८/२०१९ अन्वये निविदामध्ये बदल करणे व ३ वर्षासाठी निविदा काढण्यात यावी असे नमुद करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने वेळेत निविदा तयार होणार नसल्याने व विधानसभा निवडणुक आचारसंहीता लागु होणार असल्याने उक्त कामासाठी ३ महीने कालावधी अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सदर कामास मुदत वाढ मिळणेकामी प्रस्ताव सादर करुन दिनांक ९/९/२०१९ रोजी मा.आयुक्त सो यांनी दिनांक ९/१/२०२० पर्यत मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच मे. महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सह संस्था मर्या. यांची दिनांक १०/१/२०२० अखेर होणा-या खर्चावर मान्यता संपुष्टात आलेली आहे.त्यामुळे ठेकेदार यांना दि ११/१/२०२० ते १०/९/२०२० अखेर ९ महीने कालावधी करिता अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत येणा-या अंदाजे र.रु.१५,७५,०००/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख पंच्याहत्तर हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२६ विषय क्रमांक – २

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचेकडील पत्र क्र.मसाभां/१७/कावि/९४/२०२०, दि.२३/०७/२०२०

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधतात्मक उपाय योजना करणेकामी बालेवाडी, मोशी व आकुर्डी भविष्यात केल्या जाणा-या कोवीड केअर सेंटर तसेच Institonal Quarantine केलेल्या व्यक्ती व रुग्ण आवश्यक साहित्य (कोरोना किट्स) खरेदीकामी ई निविदा क्रं.07/2020-21 अन्वये 1) मे.आर्थोरॉन टेक्नॉलॉजी अँन्ड एंटरप्रायजेस, चिंचवडयांचे बाब क्रं 01 साठी प्रति किट र.रु.130/- या प्रमाणे 2500 किट खरेदीकामी एकुण र.रु.3,25,000/- इतके दर प्राप्त झालेले आहेत सदरचे दर हे अंदाजपत्रकिय र.रु.4,49,000/- पेक्षा 27.61 टक्केने कमी आहे. 2. मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, चिंचवड याचे बाब क्रं. 2 साठी प्रति किट र.रु.252/- या प्रमाणे 2500 किट खरेदीकामी एकुण र.रु.6,30,000/- इतके दर प्राप्त झालेले आहेत सदरचे दर हे अंदाजपत्रकिय र.रु.10,36,000/- पेक्षा 39.18 टक्केने कमी आहे. तसेच बाब 01 लहान किट व 02 मोठे किट असे एकुण- 5000 किटस साठी एकुण र.रु.9,55,000/- (अक्षरी र.रु नऊ लाख पंचावन्न हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२७ विषय क्रमांक – ३
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – पाणीपुरवठा मुख्यालय
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/८/कावि/४७३/२०२०, दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.4/11/2019-20 अन्वये मोशी बो-हाडेवाडी परिक्षेत्रीतील पाण्याचे टाक्याचे परिचलन करणे व किरकोळ दुरुस्तीचे कामे करणेकामी मे.जनसेवा स्वयं रोजगार सेवा सह संस्था मर्यादित नि.र.रू.74,97,913/- (अक्षरी र.रु. चौ-याहत्तर लाख सत्यान्नव हजार नऊशे तेरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.74,90,681/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.74,90,681/- पेक्षा 27% कमी म्हणजेच र.रु.54,68,197/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.7,232/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.54,75,429/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२८ विषय क्रमांक – ४
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभां/४/कावि/६७६/२०२०, दि.२८/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक मनपास व कोविड केअर सेंन्टरसाठी तातडीने आवश्यक 01) सॅनिटायझर 50 मिली 83702 नग र.रू.24.99 प्रती नग प्रमाणे र.रू.20,91,713/- 02) सॅनिटायझर (स्प्रेसह बॉटल)100 मिली 12994 नग र.रू.49.72 प्रती नग प्रमाणे र.रू.6,46,061/- 03) सॅनिटायझर 05 लिटरचे कॅन 5447 कॅन र.रू.1303.68 प्रमाणे र.रू.71,01,145/- 04) फेस शिल्ड 3471 नग र.रू.47.20 प्रमाणे र.रू.1,63,831/- 05) इंनफ्रारेड थर्मामिटर 244 नग र.रू.2200/- र.रू.5,36,800/- प्रमाणे असे 01 ते 05 बाबीसाठी एकुण र.रू.1,05,39,550/- मे.हिन्दुस्तान एंन्टीबायोटीक्स लि. पिंपरी-18 भारत सरकारचा उपक्रम यांचेकडुन थेट पध्दतीने खरेदी करणेकामी येणारे र.रू.1,05,39,550/- (अक्षरी र.रू.एक कोटी पाच लाख एकोणचाळीस हजार पाचशें पंन्नास फक्त) चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) (क) व अनुसुची ड प्रकरण क्रमांक.5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२९ विषय क्रमांक – ५

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभां/१५/कावि/३२७/२०२०, दि.३१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना विषाणूच्या (COVID 19) प्रतिबंधासाठी Covid Care Centre साठी दर करार पद्धतीने मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांचेकडून उशा 10000 नग प्रति नग रुपये 299.72 उशांचे कव्हर 10000 नग प्रति नग रुपये 60.90 व टर्किश नॅपकिन रुपये 45.41 याप्रमाणे दर करारानुसार थेट पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रू.49,68,500/- (अक्षरी र.रू.एकोणपन्नास लाख अडूसष्ट हजार पाचशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांचेबरोबर करारनामा न करता खरेदी करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३३० विषय क्रमांक – ६

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/४१/२०२०, दि.०४/०८/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ऑटो क्लस्टर सेंटर मधील २ मोकळया हॉल मध्ये "कोरोना" (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे. सदरील काम ऑटो क्लस्टर येथे नियोजित असून सदरचा भाग शहराच्या मध्यवर्ती भागात येत असून सदर परिस्थितीत कोवीड-१९ यांचे वाढते प्रमाण बघता मनपाच्या दवाखन्यात खाटांची संख्या अपुरी पडत आहे त्या अनुषागांने सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण असले कारणाने नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिद्ध करणे तसेच निविदा पुर्व व निविदा पश्चात ही सर्व कामे करणेसाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. सदर बाबत संदर्भ क्र.१ अन्वये मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर /सल्लागार यांच्याकडून दरपत्रक मागविण्यासाठी दि.२३/०७/२०२० रोजी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेत आली होती. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत दि.३०/०७/२०२० रोजी पर्यंत एकूण: ०३ सीलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत. सादर कोटेशन दि.३०/०७/२०२० दुपारी ३.०० वाजता उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर करण्यात आला आहे. सादर तक्यानुसार मे नियोजन कन्सल्टंटस यांनी लघुत्तम दर 1.98% (जीएसटी सोडून) सादर केल्याचे दिसून येते. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ऑटो क्लस्टर सेंटर मधील २ मोकळयाहॉल मध्ये "कोरोना" (COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.नियोजन कन्सल्टंटस यांची लघुत्तम दर 1.98% नुसार निविदापूर्व व निविदापश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेबाबत व त्याकामी येणारी फी 1.98% (जीएसटी सोडून) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७३३१ विषय क्रमांक – ७

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचेकडील पत्र क्र.मभां/६/कावि/२६२/२०२०, दि.०५/०८/२०२०

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उभारणेत येणा-या कोवीड-19 सेन्टर करीता विविध विद्युत साहित्य खरेदीबाबत ई निविदा क्र.11/2020-21 अन्वये सात निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.आद्या प्रॉपर्टीज यांचे बाब क्र.1 साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर र.रू.5,20,800/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.7,03,584/- या दरपेक्षा -25.97% कमी आहेत. प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.आर्या इंजिनिअरिंग यांचे बाब क्र.2 साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.5,20,800/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.5,37,264/- दरापेक्षा-3.06% कमी आहेत व याप्रमाणे सदर एकुण बाब क्र.1 व 2 एकुण 02 बाबी साहित्याचे लघुत्तम एकुण दर र.रू.10,41,600/- (अक्षरी र.रू.दहा लाख एक्केचाळीस हजार सहाशे फक्त) हे अंदाजपत्रकीय दर र.रू.12,40,848/- पेक्षा -16.05% कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार सदर लघुत्तम निविदाकार यांना तातडीने पुरवठा आदेश निर्गत करून त्यांचेबरोबर करारनामा करणेची कार्यवाही करणेत आलेली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३३२ विषय क्रमांक – ८

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आमुका/११/कावि/२०४/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता व पिंपरी चिंचवड महापालिकेकडे अतिदक्षता विभाग (ICU) चालविण्याकरीता असलेल्या मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता मनपा. रुग्णालयातील अतिदक्षता विभाग (ICU) खाजगी संस्थांना चालविणेकरीता देणेकामी Expression of Interst (EOI) क्र.४/२०२०-२१ अन्वये प्रसिध्द करणेत येवुन इच्छुक संस्थाकडुन दर मागविणेत आले होते. त्यामध्ये मे.रुबी अलकेअर सर्विसेस प्रा.ली. यांचा वायसीएम हॉस्पिटल मधील ICU-1 व ICU-2 (१५+१५) ३० बेड करीता र.रु.७५००/-प्रति बेड/प्रति दिन असा दर प्राप्त झालेला आहे. तातडीची बाब लक्षात घेता त्यांना प्राप्त मंजुर दराने कामाचा आदेश देणेत आला असुन, मंजुर दरानुसार तीन महिने अथवा कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव विचारात घेता आवश्यकतेनुसार अधिक कालावधीकरीता येणा-या र.रु.२,०२,५०,०००/- (अक्षरी र.रु.दोन कोटी दोन लाख पन्नास हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास व त्यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३३३ विषय क्रमांक – ९
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – क क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/जा/८२६/२०२०, दि.०६/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

क क्षेत्रीय विद्युत विभागांतर्गत सन २०१९-२० या वर्षात भांडवली व महसुली कामांची निविदा मागवून विविध विद्युत विषयक विकास कामे करणे चालू आहे. तथापि कोविड-१९ च्या लॉकडाऊन परिस्थितीमुळे सन २०१९-२० अंदाजपत्रकातील काही कामांची धावती व अंतिम बिलाची कार्यवाही करणे शक्य न झाल्याने सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील सदर अखर्चित बिलाची उपलब्ध तरतूद खाली दर्शविलेल्या लेखाशिर्ष, अंदाजपत्रकीय पानांक व अ.क्र. नुसार आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे T-3 वरील टिपणी नुसार क क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभागाचे सन २०११९-२० च्या भांडवली व महसूली किरकोळ देखभाल दुरुस्ती सुधारीत अंदाजपत्रकातील तरतूद र.रु.१,९०,७१,०००/- झालेला खर्च र.रु.१,०६,३६,५८६/- व शिल्लक र.रु.८४,३४,४१४/- इतकी आहे. ३१ मार्च २०२० अखेर अदा न करता आलेली एकूण र.रु.४८,५९,७७२/- (अक्षरी र.रू.अठ्ठेचाळीस लाख एकोणसाठ हजार सातशे बाहत्तर फक्त) रकमेची बीले या शिल्लक रकमेतून सन २०२०-२१ च्या प्रारंभीक शिलकेत वाढ करून अदा करता येतील. उपरोक्त प्रमाणे विभागाअंतर्गत अखर्चित बिलाच्या तरतुद वर्गीकरणास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १०२ अन्वये प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतुद वर्गीकरणाचा अन्य कामांवर अथवा त्यांच कामावर काही परिणाम होणार नाही. सबब प्रस्तावात नमूद प्रमाणे अखर्चित बिलाच्या लेखाशिर्षांतर्गत तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३३४ विषय क्रमांक – १०
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वैद्य/१/कावि/१०८७/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

खाजगी व शासकिय संस्थेतील विद्यार्थ्यांना वैद्यकिय, दंत, आयुर्वेद, युनानी, होमिओपँथी पदवी अभ्यासक्रम, भौतिकोपचार, व्यवसायोपचार या सारखे निमवैदयकिय पदवी अभ्यासक्रम व परिचर्या विषयक पदवी/पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे सरावाकरीता करारनामा करुन शासन निर्णय क्रमांक एचएसपी-१६०१/प्र.क्र.३८२/०१, शिक्षण-२ मंत्रालय ३२ दि ८ जानेवारी २००१ नुसार अनामत रक्कम घेणेस व महाराष्ट्र शासन यांचेकडील वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एचएसपी-2015/प्र.क्र.196/शिकाना/शिक्षण-1 यांचेकडील दिनांक १२ डिसेंबर २०१७ नुसार प्रति विद्यार्थी, प्रति दिन प्रती खाट रक्कम रुपये १५०/- या प्रमाणे फि आकारुन तसेच सदर शुल्कामध्ये प्रतिवर्षी १०% वाढ करणेस त्यामुळे दरवर्षी कराराचे नुतनीकरण १०% वाढीव दरासह करणे बंधनकारक राहील या अटिवर महाविद्यालयामधील/संस्थेमधील विद्यार्थ्यांना वाय.सी.एम.सह इतर मनपाचे रुग्णालये सरावाकरीता सलग्न करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७३३५ विषय क्रमांक – ११
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – कायदा
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कास/६/कावि/२३६/२०२०, दि.०६/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठीचे आकुर्डी येथील मा.न्यायालयामधील मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन २०१९-२०२० चे वेतन व भत्ते र.रु.८५,४०,११२/- (अक्षरी र.रु.पंच्याऐंशी लाख चाळीस हजार एकशे बारा फक्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून प्रतिपुर्तीव्दारे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३३६ विषय क्रमांक – १२
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/अमुख्य/कावि/१६३/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समिती मंजूर ठराव क्र.6493 दि.22/01/2020 नुसार खालील प्रमाणे विषय मंजूर करणेत आला होता. मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.54/51/2019-20 अन्वये प्रभाग क्र.१४ मध्ये स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची व इतर अनुषंगिक कामे करणेकामी M/S.S.S.Enterprises नि.र.रू.40,95,443/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख पंच्यान्नव हजार चारशे त्रेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,61,622/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,61,622/- पेक्षा 35.99% कमी म्हणजेच र.रु.18,95,734/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.16,754/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.20,200/- = एकुण र.रु.19,32,688/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. वरील ठरावामध्ये रकमेमध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक असलेने खालील प्रमाणे दुरुस्ती ठराव करणेकामी प्रस्तावित करणेत येत आहे. आवश्यक दुरुस्त ठराव:- मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.54/51/2019-20 अन्वये प्रभाग क्र.१४ मध्ये स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची व इतर अनुषंगिक कामे करणेकामी M/S.S.S.Enterprises नि.र.रू.40,95,443/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख पंच्यान्नव हजार चारशे त्रेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,15,882/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,15,582/- पेक्षा 35.99% कमी म्हणजेच र.रु.25,70,374/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.61,161/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.18,700/- = एकुण र.रु.26,50,235/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू

असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील अशी दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३३७ विषय क्रमांक – १३
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.विमुका/४/कावि/२५९/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.20-01/2019-2020 अन्वये इ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत भोसरी येथील नवीन विद्युतदाहिनी (क्रमांक-2) बसविणे व अनुषांगिक कामे करणे मे.कल्याणी एन्टरप्रायजेस निविदा र.रु.94,77,000/- (अक्षरी र.रु.चौ-याण्णव लाख सत्त्याहत्तर हजार फक्त) पेक्षा -12.16% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७३३८ विषय क्रमांक – १४
दिनांक – १२/०८/२०२०
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७२५५, दि.२२/०७/२०२० मधील “ नियुक्ती करण्यात आलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, तसेच बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांचे मानधनात वाढ करणेस व मानधन स्वरुपातील पदांना अदा करावयाचे मानधनाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.” या ऐवजी **“ नियुक्ती करण्यात आलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, तसेच बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांचे मानधनात माहे एप्रिल २०२० पासून प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ करणेस व मानधन स्वरुपातील पदांना अदा करावयाचे मानधनाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.”** या प्रमाणे दुरुस्तीसह सदर ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३३९ विषय क्रमांक – १५

दिनांक – १२/०८/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७२६७, दि.२२/७/२०२० मधील " मे.कल्याणी एन्टरप्राईजेस यांचेकडून निविदा र.रु.४२,३२,६०८/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख, बत्तीस हजार, सहाशे आठ फक्त) पेक्षा ४% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस " या ऐवजी **" मे.कल्याणी एन्टरप्राईजेस यांचेकडून निविदा र.रु.४२,३२,६०८/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख, बत्तीस हजार, सहाशे आठ फक्त) पेक्षा ४.१% कमी या दराने ठेकेदाराकडून काम करुन घेणेस "** या प्रमाणे दुरुस्तीसह सदर ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४० विषय क्रमांक – १६

दिनांक – १२/०८/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.८ (नविन प्रभाग क्र.१०) आरक्षण क्र.३०१ बर्ड व्हॅली समोरील खाण विकसित करणे या कामाचा विशेष योजने अंतर्गत समावेश असून सदरचे काम जागेवरती पूर्ण झाले असून सदरील ठेकेदारास बील अदायगी करणेसाठी सन २०२० चे अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद उपलब्ध नसल्याने प्रभागांतर्गत कामातून खालील प्रमाणे वाढ/घट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अ. क्र. | सन २०२०-२१ चा मुळ अंदाज | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्र.क्र.८ (नविन प्र.क्र.१०) आरक्षण क्र.३०१ बर्ड व्हॅली समोरील खाण विकसित करणे. | स्थापत्य विशेष योजना | ६५ | ३ | ० | ५२,७०,००० | ० |
| २ | प्र.क्र.१० मध्ये नाल्यांना नविन आरसीसी सिमाभिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे | स्थापत्य विशेष योजना | ६१ | ३९ | ५,००,००० | --- | १,७०,००० |
| ३ | प्र.क्र.१० मधील रस्ते विकसित करणे. | स्थापत्य विशेष योजना | २९ | ९ | २०,००,००० | --- | २०,००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | प्र.क्र.१० मधील नाल्यांचे आरसीसी व सुधारणा विषयक कामे करणे. | नाला ट्रेनिंग | ९८ | ६ | ३१,००,००० | --- | ३१,००,००० |
| | एकूण | | | | | ५२,७०,००० | ५२,७०,००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४१ विषय क्रमांक – १७
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/१६४/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.10/01/2020-2021 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ऑटो क्लस्टर सेंटर मधील मोकळ्या हॉलमध्ये कोरोना (COVDI-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.शिवम एंटरप्रायजेस नि.र.रू.74,44,936/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख चव्वेचाळीस हजार नऊशे छत्तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.74,16,186/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.74,16,186/- पेक्षा 27.62% कमी म्हणजेच र.रु.53,67,835/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.13,039/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.28,750/- = एकुण र.रु.54,09,624 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४२ विषय क्रमांक – १८
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – लेखा
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/१३४/२०२०, दि.१२/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासन निर्णय क्रमांक एनयुआर-२०१३/प्र.क्रं.३३८/नवि-३३ मंत्रालय मुंबई दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ अन्वये सन २०१९-२० मध्ये येणा-या अंदाजित संचलनतूटीच्या ४० टक्के रक्कम तसेच पासेसपोटीची प्रतीपूर्तीची रक्कम अदा करणेबाबत ऑगस्ट २०२० विषयाचा सविस्तर तपशिल – सह व्यवस्थापकीय संचालक यांचे कडील पत्र क्रं.पीएमपीएमएल/मुलेविअ/७३१ दिनांक २०/०७/२०२० अन्वये सन २०१९-२० ची अंदाजीत संचलनतूट र.रु.३०७.९८ कोटी गृहीत धरुन ४० टक्के नुसार पिंपरी चिंचवड मनपाचा संचलनतूटीचा हिस्सा १२३.१९ कोटी व विविधपासेसच्या अनुदानापोटी सन २०१९-२०

साठी मागणी र.रु.१४.८० कोटी राहील असे नमूद केले असून माहे ऑगस्ट २०२० चे प्रतिमहा र.रु.१०.२७ कोटी दरमहा संचलनतूट अग्रीम स्वरुपात द्यावी तसेच दरमहा सवलतीचे पासेस पोटी र.रु.१.२३ कोटी असे एकूण र.रु. ११.५० कोटी द्यावी अशी विनंती केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चव्वेचाळीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलन तूट १३३.५८ कोटी, विविध प्रकारचे पासेस र.रु.१४.५९ कोटी, बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी र.रु.६० कोटी असा अपेक्षित खर्च धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून र.रु.९ कोटी संचलन तूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.२३ कोटी असे एकूण १०.२३ कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी तेवीस लाख फक्त) सन २०१९-२० च्या अंदाजित संचलन तुटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे ऑगष्ट २०२० चे अदा करावयाचे असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४३ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/३/कावि/५२७/२०२०, दि.१२/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागांतर्गत ०८ रुग्णालये व २७ दवाखाने कार्यरत असून, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे बहुविध शाखांचे व ७५० बेडसचे अद्यावत रुग्णालय पदव्युत्तर संस्थेसह सुरु आहे. सद्यस्थितीत कोरोना या विषाणूच्या संसर्गामुळे फैलावणा-या कोवीड १९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावास आळा घालणेकरीता शासन मार्गदर्शक सुचनांनुसार Covid Care Centre (सीसीसी), Dedicated Covid Health Centre (डीसीएचसी), Dedicated Covid Hospital (डीसीएच) निश्चित करुन या ठिकाणी रुग्णांच्या उपचारांची सोय महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोवीड १९ आजाराने बाधीत रुग्णांकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याकरीता महापालिकेमार्फत कार्यक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी Covid Care Centre (सीसीसी), Dedicated Covid Health Centre (डीसीएचसी), Dedicated Covid Hospital (डीसीएच) सुरु करण्यात आलेले आहेत. कोवीड केअर सेंटर व्यतिरिक्त महानगरपालिकेची ०७ रुग्णालये देखील सुरु असून या ठिकाणी कोवीड १९ व्यतिरिक्त अन्य रुग्णांवरील उपचार केले जात असतात, त्याचप्रमाणे कोवीड १९ चे अनुषंगाने कंटेन्मेंट झोन सर्व्हेक्षण, अहवाल, स्वॅब कलेक्शन, कॉन्टॅक्ट ट्रेसिंग इ. बाबतचे देखील कामकाज रुग्णालयांमार्फत केले जात आहे. सद्यस्थितीत उद्भवलेल्या कोवीड १९ आजाराच्या संसर्गामुळे महापालिकेमार्फत करणेत येत असलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेली Covid Care Centre, Dedicated Covid Health Centre व Dedicated Covid Hospital तसेच याव्यतिरिक्त अन्य रुग्णालयांमार्फत सेवा पुरविण्याकरीता महापालिकेस मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची (डॉक्टर्स, स्पेशलिस्ट, पॅरामेडिकल स्टाफ इ.) आवश्यकता भासत आहे. या ठिकाणी आवश्यक संख्येचे प्रमाणात अधिकारी / कर्मचारी उपलब्ध नसल्याने व सद्यस्थितीत उद्भवलेल्या

कोवीड १९ या संसर्गजन्य आजाराचे पार्श्वभूमीवर वैद्यकिय अधिकारी तसेच अन्य पॅरामेडिकल कर्मचारी यांच्या मानधन स्वरुपात रूग्णालयीन कामकाजाचे सोईचे दृष्टीने हंगामी स्वरूपात दरमहा एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी नेमणूका करण्यात आलेल्या असुन आवश्यकतेनुसार आणखी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेत येत आहे व तशी आवश्यकता आहे. सद्यस्थितीतीत कोवीड १९ आजाराचे अनुषंगाने उद्भवलेली आपत्कालीन परिस्थिती विचारात घेता वैद्यकिय अधिकारी तसेच दंतशल्य चिकित्सक यांची रुग्णालयीन कामकाजाकरीता आवश्यकता आहे. दंतशल्य चिकित्सक यांचेकडील दि.२१-०७-२०२० रोजीचे निवेदनानुसार अन्य महापालिकांप्रमाणे र.रु.६०,०००/- इतके मानधन अदा करणेबाबतची मागणी केलेली आहे. वैद्यकिय विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या पदांना यापूर्वीचे प्रचलित पध्दतीनुसार देय मानधनाचा तपशील पुढीलप्रमाणे:

| पदनाम | प्रचलित मानधन दरमहा |
|---|---|
| वैद्यकिय अधिकारी (बीएएमएस / बीएचएमएस / बीयूएमएस) | ३५,०००/- |
| दंतशल्य चिकित्सक (बीडीएस) | ४०,०००/- |

सद्यस्थितीत कोवीड १९ संसर्गामुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे पार्श्वभूमीवर कार्यरत असणा-या वैद्यकिय अधिकारी (बीएएमएस/बीएचएमएस/बीयूएमएस) व दंतशल्य चिकित्सक (बीडीएस) यांची रुग्णालयीन कामकाजाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेता त्यांना देय असणा-या मानधनाचे रकमेमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तरी यापुढे वैद्यकिय विभागांतर्गत मानधन स्वरुपात नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी (बीएएमएस/बीएचएमएस/बीयूएमएस) व दंतशल्य चिकित्सक (बीडीएस) यांना कोवीड १९ आपत्कालीन परिस्थिती कालावधीकरीता र.रु.५०,०००/- इतके मासिक मानधन अदा करणेस व याकरीता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४४ | विषय क्रमांक – २०

दिनांक – १२/०८/२०२० | विभाग – फ क्षेत्रीय विद्युत

सुचक – मा.शितल शिंदे | अनुमोदक – मा. राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/वि/जा/२३२/२०२०, दि.११/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी – चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.११ घरकुल योजना चिखली येथील D5, D6, D7, D8 व तसेच नवीन B9, B10, B11, B12 व F19 एकूण ९ इमारती मध्ये Covid-19 या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी Covid Care Centre (CCC) व अलगीकरण (Intuitional Quarantine) सेंटर, मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/ १२२६/२०२० दि.२५/०६/२०२० अन्वये स्थापन करण्यात आले आहे. तसेच मा.अतिरिक्त आयुक्त – २ यांचेकडील पत्र क्र.९/०७/२०२० नुसार घरकुल चिखली परिसरातील नवीन ५ इमारत क्र.B9, B10, B11, B12 व F19 या Covid-19 अंतर्गत येणा-या रुग्णासाठी Isolation Ward म्हणून नव्याने उपलब्ध करून देण्यात आले

आहेत. वरील एकूण ९ इमारतीचा म.रा.वि.वि.कंपनीचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास रुग्णांची गैरसोय होईल व अत्यावश्यक कर्मचा-यांच्या कामात अडथळा निर्माण होईल. त्यासाठी प्रत्येक इमारतीसाठी 62.5 KVA जनरेटरप्रमाणे ९ इमारतीसाठी ९ जनरेटर (62.5KVA) चे बसविण्याची आवश्यकता आहे व त्याचा प्रति जनरेटर संच प्रति महिनासाठीचा खर्च र.रुपये १,१८,८००/- असा आहे. तसेच सदर जनरेटर तीन शिप्ट मध्ये कार्यन्वित ठेवणेकरीता तीन अकुशल कर्मचा-यांची आवश्यकता आहे. सदर जनरेटरचे दरामध्ये एक अकुशल कर्मचा-यांचा समावेश असल्याने दोन अकुशल कर्मचारी नेमणे आवश्यक आहे. सदर जनरेटर एक महिनेकरीता तात्पुरते स्वरूपात भाडे तत्वावर घेण्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून अंदाजपत्रकीय रक्कम १४,८८,८५२/- इतकी असून त्यावर १८% GST रक्कम रुपये २,६७,९९३/- सह सदर कामास एकूण र.रू.१७,५६,८४५/- (अक्षरी र.रू.सतरा लाख छप्पन हजार आठशे पंचेचाळीस फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा मध्यवर्ती भांडार विभागाकडील "करोना निधी" या लेखाशिर्षकामधून करण्यात येईल. सदरचे काम हे तातडीचे असल्याने निविदा कार्यवाही कामी लागणारा वेळ लक्षात घेता सदर काम पुर्व मान्य मंजूर दराने करून घेणे आवश्यक आहे. फ क्षेत्रीय कार्यालयाकडील मागील वर्षाचे अशा प्रकारचे काम निविदा नोटीस क्र. २०/०८, २०१९/२० अन्वये मे. मोरया मंडप डेकोरेटर्स यांचेकडून १% कमी या मंजूर दराने करून घेण्यात आले आहे. मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांना चिखली घरकुल योजना येथील कोविड केअर सेंटर करीता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर जनित्र संच बसविणेचे कामाबाबत विचारणा केली असता मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांनी अन्वये सदर काम १% कमी पुर्व मंजुर दराने करणेस तयार असलेबाबत कळविले आहे. तरी, फ क्षेत्रीय कार्यालय अंर्तगत प्रभाग क्र. ११ घरकुल योजना चिखली येथील कोविड केअर सेंटर (CCC) चे D5, D6, D7, D8 व नवीन B9, B10, B11, B12 व F19 अशा ९ इमारतीकरीता तात्पुरत्या स्वरूपात जनित्र संच भाडेतत्वावर प्रत्येक शिफ्टमध्ये एक कामगार याप्रमाणे कामगारासह वापरणेबाबतचे काम मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांना १% कमी या पुर्व मंजूर दराने देणेचे कामास व सदरचा खर्च मुख्य कार्यालयाकडील मध्यवर्ती भांडाराकडील करोना निधी या लेखाशिर्षातून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४५ विषय क्रमांक – २१

दिनांक – १२/०८/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.हॉस्पिटल मधील रक्तपेढी विभागास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (३)(क) नुसार करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थितीत व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनकस्थितीचा सामना करणेकामी Covid-19 रुग्णांकरिता Convalescent Plasma Therapy या उपचार पध्दती करण्यासाठी Single Donar Platelet Bag with ACD Solution Kit ची तातडीने आवश्यकता असलेने सदर खरेदी तात्काळ करणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर किटची उत्पादित कंपनी M/S.Trima Accel या कंपनीचे

अधिकृत विक्रेते मे.श्री एन्टरप्राईजेस, पुणे यांचेकडून कोटेशन दराने र.रु.८,१८३/- + GST प्रती किट या दराप्रमाणे १०० किट खरेदीकामी होणा-या एकूण र.रु.८,१८,३००/- (अक्षरी र.रु.आठ लाख, अठरा हजार तिनशे फक्त) + GST चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण ५ (२)(२) नुसार करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/७७१/२०२०
दिनांक – १४/०८/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.